RNI No. MAHBIL /2012/47976
www.dgps.maharashtra.gov.in

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग एक-अ–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - ११, अंक - १२] शनिवार, मार्च ५, २०२२ / फाल्गुन १४, शके १९४३ [पृष्ठे ३

असाधारण क्रमांक १२

प्राधिकृत प्रकाशन

जिल्हाधिकारी यांजकडून

वाचा.-- (१) पीठासन अधिकारी लोणंद नगरपंचायत अध्यक्ष/उपाध्यक्ष निवडणूक २०२२ तथा उपविभागीय अधिकारी, फलटण उपविभाग, फलटण यांचेकडील पत्र जा. क्र. वशी-१/अ.उपा.निवडणूक/२१५२/२०२२, दिनांक १० फेब्रुवारी २०२२.

(२) पीठासन अधिकारी, कोरेगाव नगरपंचायत अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडणूक २०२२ तथा उपविभागीय अधिकारी, कोरेगाव उपविभाग, कोरेगाव यांचेकडील पत्र क्रमांक निवडणूक/कोरेगाव/नपं/कावि/२६४/२०२२, दिनांक १० फेब्रुवारी २०२२ रोजीचे पत्र व विशेष सभेचे इतिवृत्त.

(३) पीठासन अधिकारी, पाटण नगरपंचायत अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडणूक २०२२ तथा उपविभागीय अधिकारी, पाटण उपविभाग, पाटण यांचेकडील पत्र क्रमांक पानपा/निवडणूक/१३५१/२०२२, दिनांक १० फेब्रुवारी २०२२ रोजीचे पत्र व विशेष सभेचे इतिवृत्त.

(४) पीठासन अधिकारी, अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडणूक दहिवडी नगरपंचायत तथा उपविभागीय अधिकारी, माण-खटाव उपविभाग, दहिवडी यांचेकडील पत्र जा. क्रमांक दहिनपं/कावि/१४१/२०२२, दिनांक १० फेब्रुवारी २०२२ रोजीचे पत्र व विशेष सभेचे इतिवृत्त.

(५) पीठासन अधिकारी, वडूज नगरपंचायत अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडणूक २०२२ तथा उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्रमांक ४, सातारा यांचेकडील जा. क्रमांक वनपं/११५/२०२२, दिनांक ११ फेब्रुवारी २०२२ रोजीचे पत्र व विशेष सभेचे इतिवृत्त.

(६) पीठासन अधिकारी, खंडाळा नगरपंचायत अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडणूक २०२२ तथा उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, वाई यांचेकडील पत्र जा. क्रमांक खंनपं/७०६, ७०७, ७०८, ७०९/२०२२, दिनांक १० फेब्रुवारी २०२२ रोजीचे पत्र व विशेष सभेचे इतिवृत्त.

(७) महाराष्ट्र नगरपरिषदा व नगरपंचायती (अध्यक्ष पदाची निवडणूक), (सुधारणा) नियम, २००९ मुद्दा क्रमांक ७ (क) व कलम ३४१ ब-२ (४).

(८) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ५१ *(अ), (४).*

आदेश

क्रमांक साशा/नपा/(न.न.पं. अ व उपा. निवडणूक)/१४८/२०२२.--ज्याअर्थी, सातारा जिल्ह्यातील लोणंद, कोरेगाव, पाटण, दहिवडी, खंडाळा नगरपंचायतीमधील सदस्यांमधून दिनांक १० फेब्रुवारी २०२२ व वडूज नगरपंचायत दिनांक ११ फेब्रुवारी २०२२ रोजी घेण्यात आलेल्या विशेष सभेमध्ये अध्यक्ष व उपाध्यक्षपदी निवड झालेल्या सदस्यांची नावे अध्यक्ष पदावर निवड झालेल्या सदस्याचे नाव महाराष्ट्र नगरपरिषदा व नगरपंचायती (अध्यक्ष पदाची निवडणूक), (सुधारणा) नियम, २००९ मुद्दा क्रमांक ७ (क) व कलम ३४१ ब-२ *(४)* व तसेच उपाध्यक्षपदी निवड झालेल्या सदस्याचे नाव महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ५१ *(अ), (४)* नुसार महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती (अध्यक्षपदाची निवडणूक), (सुधारणा) नियम, २००९ मुद्दा क्रमांक ७ (क) व कलम ३४१ ब-२ *(४)* व तसेच उपाध्यक्षपदी निवड झालेल्या सदस्याचे नाव महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ५१ *(अ), (४)* नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून मी, शेखर सिंह, जिल्हाधिकारी, सातारा, लोणंद, कोरेगाव, पाटण, दहिवडी, वडूज, खंडाळा नगरपंचायतीमधील अध्यक्ष व उपाध्यक्षपदी निवड झालेल्या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे राजपत्रात प्रसिद्ध करीत आहे.

परिशिष्ट

अ. क्र.	नगरपंचायतीचे नाव	निवडून आलेल्या सदस्याचे नाव	निवड झालेल्या पदाचे नाव
१	२	३	४
१	लोणंद नगरपंचायत, लोणंद	मधुमती कैलास पलंगे	अध्यक्ष
		शिवाजीराव शंकरराव शेळके	उपाध्यक्ष
२	कोरेगाव नगरपंचायत, कोरेगाव	दिपाली महेश बर्गे	अध्यक्ष
		सुनिल बाळासो बर्गे	उपाध्यक्ष
३	पाटण नगरपंचायत, पाटण	मंगल शंकर कांबळे	अध्यक्ष
		सागर दादासो पोतदार	उपाध्यक्ष
४	दहिवडी नगरपंचायत, दहिवडी	सागर अमृत पोळ	अध्यक्ष
		राजेंद्र रामचंद्र साळुंखे	उपाध्यक्ष
५	वडूज नगरपंचायत, वडूज	मनिषा रविंद्र काळे	अध्यक्ष
		मनोज रामचंद्र कुंभार	उपाध्यक्ष
६	खंडाळा नगरपंचायत, खंडाळा	नंदा तात्याबा गायकवाड	अध्यक्ष
		सुधीर चंद्रकांत सोनवणे	उपाध्यक्ष

शेखर सिंह,

जिल्हाधिकारी, सातारा.

सातारा, १७ फेब्रुवारी २०२२.

वाचा : (१) मुख्याधिकारी, मलकापूर नगरपरिषद, मलकापूर यांचेकडील पत्र सा. प्र/निवडणूक/जा. क्र. १२४०/२०२२, दिनांक ३१ जानेवारी २०२२.

(२) पीठासन अधिकारी तथा नगराध्यक्षा, मलकापूर नगरपरिषद, मलकापूर यांचेकडील दिनांक ३१ जानेवारी २०२२ रोजीच्या विशेष सभेचे इतिवृत्तांत.

(३) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम २० *(१)*.

(४) महाराष्ट्र नगरपरिषद आणि नगरपंचायत नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पद्धत नियम, २०१० मधील मुद्दा क्रमांक ६.

आदेश

क्रमांक साशा/नपा/(मलकापूर न.प. स्वीकृत सदस्य निवडणूक)/५१९/२०२२.--- ज्याअर्थी, सातारा जिल्ह्यातील मलकापूर नगरपरिषदेच्या स्वीकृत सदस्य पदांच्या निवडीबाबत दिनांक ३१ जानेवारी २०२२ रोजी पार पडलेल्या विशेष सभेमध्ये स्वीकृत सदस्य पदावर निवड झालेल्या सदस्यांचे नाव महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम २० *(१)* व महाराष्ट्र नगरपरिषद आणि नगरपंचायत नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पद्धत नियम, २०१० मधील मुद्दा क्रमांक ६ अन्वये राजपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम, १९६५ चे कलम २० *(१)* व महाराष्ट्र नगरपरिषद आणि नगरपंचायत नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या करण्याची पद्धत नियम, २०१० मधील मुद्दा क्रमांक ६ नुसार प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून मी, शेखर सिंह, जिल्हाधिकारी, सातारा, मलकापूर नगरपरिषदेच्या स्वीकृत सदस्य पदावर निवड झालेल्या सदस्यांचे नाव पुढीलप्रमाणे राजपत्रात प्रसिद्ध करीत आहे.

परिशिष्ट

अ. क्र.	नगरपरिषदेचे नाव	निवडून आलेल्या सदस्याचे नाव	निवड झालेल्या पदाचे नाव
१	२	३	४
१	मलकापूर नगरपरिषद, मलकापूर	श्री. इंगवले अमर नारायण	स्वीकृत सदस्य

शेखर सिंह,

जिल्हाधिकारी, सातारा.

सातारा, १७ फेब्रुवारी २०२२.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.